सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १६५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. २५ जुलै २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

# ऑपरेशन सिंदूर आणि सीजफायरवर प्रश्न अखेर सरकारने संसदेत सांगितले सत्य

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२५नवी दिल्ली

संसदेच पावसाळी अधिवेशन सुरु आहे. या सत्रात आतापर्यंत मोठा गदारोळ पहायला मिळाला आहे. विरोधी पक्षाचा विरोध आणि घोषणाबाजीमुळे अनेकदा कामकाज स्थगित करावं लागलय. सरकारकडून ऑपरेशन सिंदूरवर उत्तर देण्यात आलं. सरकारने सांगितलं ऑपरेशन सिंदूरची सुरुवात का केली?. ऑपरेशन सिंदूरवर राज्यसभेत सरकारने उत्तर दिलय. सपा खासदाराने विचारलं की, काय ऑपरेशन सिंदूरची घोषणा आंतरराष्ट्रीय दबावापोटी झाली होती?. सपा खासदार रामजी लाल सुमन यांनी




विचारलं की, ऑपरेशन सिंदूर सुरु असताना अचानक युद्धविरामाच्या घोषणेचा सैन्याच्या मनोबलावर काय परिणाम झाला?. कारण आपलं सैन्य त्यावेळी यशस्वी ठरत होतं. अचानक झालेला युद्धविराम सैन्याचं मनोबल आणि देशवासियांच्या भावनेच्या विरोधात होता. पाकिस्तान प्रायोजित दहशतवादाला उत्तर देण्यासाठी ऑपरेशन सिंदूरची सुरुवात झाली. याचा उद्देश दहशतवादी इन्फ्रास्ट्रक्चर नष्ट करणं आणि भारतात दहशतवाद्यांना पाठवण्यापासून रोखणं हा होता, असं सरकारकडून उत्तर देण्यात आलं.

भारताची कारवाई ही टॉर्गेट ठरवून आणि मोजून-मापून होती. पाकिस्तानने काही सैन्य ठिकाणांशिवाय भारतीय नागरिक क्षेत्रांना लक्ष्य करण्याचा प्रयत्न केला. पाकिस्तानच्या या चिथावणीखोर कारवायांना भारतीय सैन्य दलाने कठोर आणि निर्णायक प्रत्युत्तर दिलं. त्यामध्ये पाकिस्तानी सैन्याचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं असं सरकारकडून सांगण्यात आलं.

त्यानंतर १० मे २०२५ रोजी पाकिस्तान सैन्य अभियानाच्या महासंचालकांनी आपल्या भारतीय समकक्षांसोबत चर्चा केली. त्यांनी गोळीबार आणि सैन्य कारवाई रोखण्याची विनंती केली. त्यावर त्याच दिवशी सहमती बनली. त्यानंतर सीजफायरची घोषणा करण्यात आली.

### पाकिस्तानातील दहशतवादी अड्डे उद्धवस्त

२२ एप्रिलला झालेल्या पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत-पाकिस्तानमध्ये तणाव वाढलेला. पहलगाम दहशतवादी हल्ल्यात २६ नागरिकांचा मृत्यू झाला. त्यानंतर भारताने पाकिस्तानवर अनेक निर्बंध लादले. पहलगामचा बदला घेण्यासाठीच भारतीय सैन्याने ऑपरेशन सिंदूर लॉन्च केलं. त्यात पाकिस्तानातील दहशतवादी अड्डे उद्धवस्त करण्यात आले.

# मंत्रिमंडळात लवकरच फेरबदल?
## राहुल नार्वेकरांना मिळणार मोठी जबाबदारी?
### राहुल नार्वेकर मंत्रिपदासाठी चर्चेत, तर मुनगंटीवार अध्यक्षपदासाठी संभाव्य नाव

विदर्भ प्रजासत्ताक दि.२५मुंबई

महायुती सरकारमधील तब्बल ८ मंत्रांना नारळ दिला जाणार असल्याचा सनसनाटी दावा सामना या दैनिकातून करण्यात आला. दैनिकात केलेल्या दाव्यामुळे राज्याच्या राजकारणात खळबळ माजली. सरकारमध्ये खरोखरंच सर्व काही आलबेल आहे का? असा सवाल उपस्थित होत आहे. सामनातील लेखात म्हटलंय की, लवकरच मंत्रिमंडळात फेरबदल होणार आहे. सध्याचे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना मंत्रिपदाची संधी मिळण्याची शक्यता आहे. तर, त्यांच्या जागी माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांना विधानसभा अध्यक्षपद देण्यात येईल, असा दावा देखील करण्यात आला आहे.




यासंदर्भात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना प्रतिक्रिया दिली आहे. 'माध्यमांमधील बातम्यांवर विश्वास नाही. पक्षाच्या नेतृत्वावर विश्वास आहे. पक्ष देईल ती जबाबदारी स्वीकारण्यासाठी मी तयार आहे. पक्षाची जी इच्छा असेल, तीच इच्छा माझी इच्छा असेल', असं त्यांनी म्हटलं आहे. मंत्रिपद मिळाल्यानंतर आनंद होईल का? हा प्रश्न विचारले असता त्यांनी, 'मला देतील ती जबाबदारी पार पाडणार आहे', असंही नार्वेकर म्हणालेत.

विधानसभा अध्यक्ष असेन किंवा मंत्री, शेवटी जनतेसाठीच काम करायचं आहे', असं राहुल नार्वेकर म्हणाले आहेत. प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना त्यांनी, विधानसभा अध्यक्ष म्हणून आपण क्रांतिकारक निर्णय घेतले आहेत. अधिवेशनामध्ये आतापर्यंत १५२ लक्षवेधी मांडण्यात आल्या आहेत. मी माझ्या पदावर चांगल्या पद्धतीनं काम करत आहे. इतर जबाबदारी मिळाली तर, ती सुद्धा योग्य पार पाडू. मी माझ्या कामाबाबतीत संतुष्ट आहे. जेव्हा केव्हा मंत्रिपदाची माळ पडेल. त्यावेळी बघू, असंही यावेळी नार्वेकर म्हणाले आहेत.

# इंदिरा गांधींना मागे टाकत पंतप्रधान मोदींचा मोठा विक्रम, आता पंडित नेहरुंशी स्पर्धा?

विदर्भ प्रजासत्ताक दि.२५नवी दिल्ली

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक नवीन विक्रम केला आहे. माजी पंतप्रधान दिवंगत इंदिरा गांधी यांचा मोठा विक्रम मोदींनी स्वतःच्या नावे केला आहे. नरेंद्र मोदी हे सर्वाधिक काळ भारताचं पंतप्रधान भूषवणारे दुसरे नेते ठरले आहेत. मोदी यांनी आज (शुक्रवार, २५ जुलै २०२५) भारताचे पंतप्रधान म्हणून ४०७८ दिवस पूर्ण केले आहेत. सलग हे पद भूषवण्याच्या बाबतीत त्यांनी इंदिरा गांधींना मागे टाकलं आहे. तसेच मोदी यांनी राज्य व केंद्रातील कारभार मिळून २४ वर्षांहून अधिक काळ सरकारचं नेतृत्व केलं आहे. हा देखील सर्व पंतप्रधानांमधील मोठा विक्रम आहे.



इंदिरा गांधी यांनी २४ जानेवारी १९६६ ते २४ मार्च १९७७ असे सलग ४०७७ दिवस (११ वर्षे ५९ दिवस) भारताच्या पंतप्रधान म्हणून कारभार पाहिला होता. तर मोदी २६ मे २०१४ पासून या पदावर आहेत. २५ जुलै २०२५ रोजी त्यांनी पंतप्रधान म्हणून ४०७८ दिवस (११ वर्षे ६० दिवस) पूर्ण केले आहेत.

सलग सर्वाधिक काळ भारताचं पंतप्रधानपद भूषवण्याच्या बाबतीत भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू आघाडीवर आहेत. त्यांनी १५ ऑगस्ट १९४७ ते २७ मे १९६४ पर्यंत सलग ६,१२६ दिवस (१६ वर्षे २८६ दिवस) भारताचं नेतृत्व केलं आहे. मोदी यांना नेहरुंचा हा विक्रम मोडण्यासाठी आणखी २०४८ दिवस भारताचं नेतृत्व करावं लागले. त्यासाठी त्यांना व भाजपाला पुढची म्हणजेच २०२९ ची लोकसभा निवडणूक देखील जिंकावी लागेल.

### मोदींच्या नावावरील इतर मोठे विक्रम

मोदी यांच्या पंतप्रधानपदाच्या कारकिर्दीविषयी इतरही काही मनोरंजक तथ्ये आहेत. जसे की, ते स्वतंत्र भारतात जन्मलेले पहिले व एकमेव पंतप्रधान आहेत. तसेच सर्वाधिक काळ भारताचं पंतप्रधानपद भूषवणारे बिगर-काँग्रेसी नेते आहेत. मोदी हे आजवरचे भारतातील सर्व पंतप्रधान व वेगवेगळ्या राज्यांच्या मुख्यमंत्र्यांपैकी एकमेव असे नेते आहेत, ज्यांच्या नेतृत्वाखाली पक्षाने सलग सहा निवडणुका जिंकल्या आहेत. मोदींच्या नेतृत्वात भाजपने २००२, २००७ व २०१२ च्या विधानसभा निवडणुका लढवल्या होत्या. या तिन्ही निवडणुकांमध्ये भाजपा विजयी झाली होती. तसेच मोदींच्या नेतृत्वात भाजपाने २०१४, २०१९, २०२४ च्या लोकसभा निवडणुका लढवल्या. या तिन्ही निवडणुकांमध्ये भाजपा विजयी झाली आहे.

# पीओपी मूर्तीवरील बंदी उठवली, मंडळांना दिलासा

विदर्भ प्रजासत्ताक दि.२५मुंबई

मुंबई उच्च न्यायालयाने जानेवारीमध्ये पीओपीच्या गणेश मूर्तीवर घातलेली बंदी उठवली आहे. यामुळे गणेशोत्सव मंडळांना मोठा दिलासा मिळाला आहे. न्यायालयाच्या या निर्णयानुसार, सहा फुटांपर्यंतच्या गणेश मूर्तीचे विसर्जन कृत्रिम तलावांमध्ये करणे बंधनकारक असेल. तर, सहा फुटांवरील गणेश मूर्तीचे विसर्जन समुद्रात करण्यास परवानगी देण्यात आली आहे. हा दिलासा पुढील वर्षाच्या गणेशोत्सवापर्यंतच कायम राहणार आहे. गणेशोत्सवाला अवघा एक महिना शिल्लक असतानाचा हा निर्णय आल्याने गणेश भक्तांमध्ये आणि मंडळांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. या निर्णयामुळे मूर्तिकारांनाही दिलासा मिळाला आहे. पर्यावरणाच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले हे नियम पाळणे आवश्यक आहे. न्यायालयाच्या या आदेशामुळे गणेशोत्सवाच्या तयारीला वेग आला आहे.

# मुंबई उच्च न्यायालयानं दिला धनंजय मुंडेंना कृषी विभागातील घोटाळ्याप्रकरणी दिलासा; अंजली दमानिया संतापल्या

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२५मुंबई

राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते आणि माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या कार्यकाळात कृषी विभागात मोठा घोटाळा झाल्याचा आरोप करण्यात आला होता. तब्बल २०० कोटींचा घोटाळा झाल्याचा दावा भाजप आमदार सुरेश धस यांनी केला होता. तर सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडे हे कृषीमंत्री असताना सुमारे २४५ कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचा आरोप केला होता. मात्र, आता मुंबई उच्च न्यायालयानं धनंजय




मुंडेंना मोठा दिलासा दिला आहे. धनंजय मुंडे यांच्या कार्यकाळात राज्य शासनाच्या कृषी विभागाने शेती पूरक साहित्य खरेदीसाठी राबवलेल्या विशेष कृती आराखड्यांतर्गत कृषी साहित्याच्या थेट खरेदी व वितरणाच्या निर्णयास मुंबई उच्च न्यायालयाने वैध ठरवले आहे. राज्य सरकारच्या या निर्णयास विरोध करणाऱ्या दोन्ही याचिका उच्च न्यायालयाने फेटाळल्या आहेत. यावर आता सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे.

अंजली दमानिया म्हणाल्या की, परवा संध्याकाळी हायकोर्टाने ऑर्डर पास केली आहे. मला यामध्ये काय त्रुटी वाटत आहेत त्या मी मांडणार आहे. हे प्रकरण आता सर्वोच्च न्यायालयामध्ये आम्ही घेऊन जाणार आहोत. शासनाकडचे जे वकील होते त्यांनी अतिशय शातीरपणे सगळं मांडलं. जे दोन जीआर होते, वेगवेगळ्या विभागाचे आहेत, असं त्यांनी मांडलं. वकिलांनी जे सगळं मांडलं ते चुकीचं आहे. या प्रकरणांमध्ये भ्रष्टाचाराचा कुठेही उच्चार देखील करण्यात आला नाही.

अंजली दमानिया पुढे म्हणाले की, धनंजय मुंडे यांची पुन्हा एकदा मंत्रिमंडळामध्ये वापसी करू नये. देवेंद्र फडणवीस यांना विनंती करते, अशी मागणी त्यांनी यावेळी केली. महाराष्ट्राचं दुर्दैव आहे की, पहिले धनंजय मुंडे नंतर माणिकराव कोकाटे असे कृषीमंत्री झाले. याचिकाकर्त्यांची चुकीची मांडणी, सरकारी वकिलांचा घोळ, त्यामुळे सगळं त्यांच्या पथ्यावर पडलं, असेही त्यांनी यावेळी म्हटले.

# वाल्मीक कराड आणि बाळा बांगर यांच्या पत्नीचे कॉल रेकॉर्डिंग व्हायरल

विदर्भ प्रजासत्ताक दि.२५बीड

परळी येथील व्यापारी महादेव मुंडे यांच्या हत्या प्रकरणात मोठी अपडेट समोर आली आहे. महादेव मुंडे प्रकरणात पुराव्यानिशी माहिती देणारे विजयसिंह उर्फ बाळा बांगर यांच्या पत्नीची आणि वाल्मिक कराडची कॉल रेकॉर्डिंग सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे. मयुरी बांगर असं बाळा बांगर यांच्या पत्नीचे नाव आहे. यामध्ये संबंधीत महिलेने सोशल मिडीयात केलेली पोस्ट डिलिट करा म्हणून वाल्मीक कराड विनंती करत असून सदर महिला मात्र विजयसिंह बांगर यांच्यासह त्यांच्या आई-वडीलांकडून झालेल्या छळाचा पाढा वाचून दाखवत वाल्मीक कराडला मदतीची विनंती करते. यावर वाल्मीक कराडकडून मदतीचे आश्वासन देखील दिले जाते.



वाल्मिक कराड आणि विजयसिंह उर्फ बाळा बांगर यांच्यातील वादातून अनेक धक्कादायक गोष्टी समोर येत आहेत. बाळा बांगर यांनी पत्रकार परिषदा घेऊन वाल्मिक कराडवर अनेक गंभीर आरोप केले आहेत. याच आरोपांच्या समर्थनार्थ त्यांनी काही कथित कॉल रेकॉर्डिंग आणि फोटो देखील व्हायरल केले आहेत.

# सत्तेच्या सिमेंटमुळे महायुती टिकून; माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांचा सरकारवर निशाणा

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२५संगमनेर

तीन पक्ष मिळून राज्यात महायुतीने सत्ता स्थापन केली. मात्र मंत्रिमंडळात असलेल्या महायुतीच्या नेत्यांमध्ये समन्वय नसून खूप अविश्वास आणि गोंधळाचे वातावरण पाहण्यास मिळत आहे. केवळ सत्तेच्या सिमेंटमुळे महायुती टिकून असल्याचे सांगत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी महायुती सरकारवर निशाणा साधला आहे.

अहिल्यानगरच्या संगमनेर येथे काँग्रेसचे जेष्ठ नेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी माध्यमांशी संवाद साधताना महायुतीवर निशाणा साधला आहे. मंत्री मंडळात समन्वय नाही, तर लाथाळ्या सुरू आहेत. निधीवरून घोटाळे सुरू असून नगरविकासचा निधी मुख्यमंत्री ताब्यात घेणार असल्याच्या चर्चा आहेत. महायुतीत एकमेकांवर अविश्वास आणि गोंधळाचे वातावरण असून फक्त सत्तेच सिमेंट आहे म्हणून टिकलेत.

आज महाराष्ट्राची अधोगती झाल्याचे चित्र पाहण्यास मिळत आहे. कारण कुणी कसंही वागतंय, काहीही बोलतंय. टारगट वृत्तीचे लोक मोठ्या आणि वडीलधाऱ्या माणसांची इज्जत घेत आहेत. आमदारच नाहीत तर त्यांचे भाऊ देखील गोळीबार करायला लागले आहेत.

# विद्येच्या प्रांगणात निष्पाप जीवांच्या मृत्यूचे तांडव
## सरकारी शाळेतील वर्गाचे छत कोसळून सात विद्यार्थ्यांचा दुर्देवी मृत्यू;१५ जण जखमी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२५झालावाड

राजस्थानच्या झालावाड जिल्ह्यात सरकारी प्राथमिक शाळेचे छप्पर कोसळून मोठी दुर्घटना घडली आहे. यात सात मुलांचा मृत्यू झाला असल्याचे वृत्त टाइम्स ऑफ इंडियाने दिले आहे. तर १५ विद्यार्थी गंभीर जखमी असल्याचे सांगितले जात आहे.

डांगीपुरा पोलीस ठाण्याचे प्रमुख विजेंद्र सिंह यांनी सांगितले की, ज्यातिकाणी शाळेचे छप्पर कोसळले तिथे जवळपास ३० ते




४० मुले उपस्थित होते. या दुर्घटनेत चार मुलांचा मृत्यू झाल्याची माहिती देण्यात आली आहे. तर आठ विद्यार्थी गंभीर जखमी असल्याचे सांगितले जात आहे.या शाळेत २७ विद्यार्थी शिक्षण घेत असल्याची माहिती मिळत आहे. दुर्घटनेनंतर स्थानिकांनी तात्काळ मदत कार्य सुरू केले. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या सर्व विद्यार्थ्यांना तात्काळ रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.या दुर्घटनेनंतर राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांनी शोक व्यक्त केला आहे. झालावाड येथील पिपलोडी शाळेची इमारत कोसळून झालेली दुर्घटना दुःखद असल्याचे ते म्हणाले. जखमी विद्यार्थ्यांना उपचार सुविधा देण्याबाबत संबंधित यंत्रणेला आदेश देण्यात आले आहेत. माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनीही या दुर्घटनेनंतर दुःख व्यक्त केले.

# फडणवीसांनी घेतली अमित शाहांची भेट; त्या मंत्र्यांची पडणार विकेट?

विदर्भ प्रजासत्ताक दि.२५नवी दिल्ली

आज दिल्लीमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली, भाजपच्या दोन्ही नेत्यांमध्ये २५ मिनिट बैठक पार पडली. राज्यात सध्या काही मंत्र्यांची प्रकरणं गाजत आहेत, व्हिडीओ देखील समोर आले आहेत. त्यामुळे विरोधकांकडून सरकारच्या कोंडीचा प्रयत्न सुरू आहे. अशा वादग्रस्त मंत्र्यांच्या राजीनाम्यासाठी भाजपचा दबाव वाढला असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. या पार्श्वभूमीवर देवेंद्र फडणवीस आणि अमित शाह यांच्या या भेटीला विशेष महत्त्व प्राप्त झालं आहे. मात्र या भेटीमध्ये नेमकी काय चर्चा झाली, याची कोणतीही अधिकृत माहिती



अद्याप समोर आलेली नाहीये.

सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार मंत्र्यांच्या वर्तनावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या आधीच उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. त्यानंतर फडणवीस यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची आज भेट घेतली. दोन्ही नेत्यांमध्ये २५ मिनिट बैठक झाली. मुख्यमंत्री फडणवीस यांचा दिल्ली दौरा वादळी ठरण्याची शक्यता आहे. या भेटीनंतर किती मंत्र्यांच्या विकेट जाणार अशी चर्चा आता राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे, वादग्रस्त मंत्र्यांना मंत्रिमंडळातून डच्चू दिला जाण्याची शक्यता, या भेटीनंतर वर्तवण्यात येत आहे.

फडणवीसांचा दिल्ली दौरा वादग्रस्त मंत्र्यांसाठी संक्रात ठरण्याची शक्यता आहे. फडणवीस यांनी आज अमित शाह यांची भेट घेतली या भेटीदरम्यान वादग्रस्त मंत्र्यांना घरी पाठवण्यासंदर्भात चर्चा झाल्याची माहिती समोर येत आहे. मात्र या भेटीत नेमकी काय चर्चा झाली हे अद्याप अधिकृतरित्या समोर आलेलं नाहीये.

## संपादकीय ......

# श्रावण मासी हर्ष मानसी

मंडळी, आज श्रावण महिन्याला सुरुवात होत आहे. आषाढ महिन्याच्या शेवटच्या दिवशी काल खवय्यांचा सुकाळ होता. श्रावण सुरू झाल्याबरोबर नेहमी येणारी पहिली बातमी म्हणजे भीमाशंकर त्र्यंबकेश्वरसाठी एसटीच्या जादा गाड्या. भाविकांना ज्योतिर्लिंग दर्शन श्रावणामध्ये त महत्त्वाचे असते. ते करता यावे म्हणून एसटी आणि इतर गाड्यांची सोय केलेली असते. आषाढाच्या शेवटच्या दिवशी मात्र सर्वत्र बाजाराला उठाव आलेला असतो. श्रावण महिन्यामध्ये लोकांचा दोन गोष्टींवर भर असतो आणि याचे परिणाम संबंधित व्यवसायावर होत असतात.

कटिंग सलून चालवणार्या लोकांना श्रावणाची धास्ती असते. कारण या काळात बरेच लोक दाढी करत नाहीत किंवा कटिंगही करत नाहीत. या काळात सलूनवाले काम नसल्यामुळे बरेचदा नुसते बसून असतात. दुसरे म्हणजे श्रावण महिन्यामध्ये बरेच लोक मांसाहार वर्ज्य करतात. त्यामुळे या व्यवसायाशी संबंधित लोकांनासुद्धा हा महिना जडच जात असतो.

दीप अमावस्येला गटारी अमावस्या असेही म्हणतात. या काळात काही लोक थेट गटारीचेही दर्शन करत असतात. पुढे महिनाभर मांसाहार न करणारे खवय्ये यांनी बुधवारी गटारी अमावस्या साजरी करत मोठ्या प्रमाणात मटण, मासळी आणि चिकनवर ताव मारला, असे आपल्या लक्षात येईल. श्रावण महिन्यानंतर गणेश उत्सवाचा प्रारंभ होतो. गणेश उत्सव झाल्यानंतर नवरात्र उत्सव असतो. या दोन्ही सणांमध्ये मांसाहारी पदार्थ वर्ज्य केले जातात. त्यामुळे आषाढ महिन्याची सांगता मात्र फार प्रचंड प्रमाणात मांसाहार करून केली जाते.

महाराष्ट्राच्या ग्रामीण आणि शहरी भागात बुधवारी आणि गुरुवारी सकाळपासूनच मटण, मासोळी आणि चिकनसाठी बाजारात खरेदीसाठी मोठी गर्दी झाली होती. या खरेदीला अक्षरशः उधाण आले होते. पुण्यातील उदाहरण घेतले तर आकडेवारीने हे स्पष्ट होईल. गणेश पेठ मासळी बाजारात खोल समुद्रातील २० ते २५ टन, नदीतील एक ते दोन टन आणि आंध- प्रदेशातून आलेले रोहू, कतला, सिलन अशी २० ते २५ टन मासोळी आयात झाली. या काळामध्ये पापलेट, सुरमई, वाम, रावस, कोळंबी आणि ओले बोंबील यांना सर्वाधिक मागणी होती. ही आकडेवारी पाहून अक्षरशः थक्क व्हायला होते.

या काळात हॉटेलवालेही गिर्हाईकांना आकर्षित करण्यासाठी विविध स्कीम राबवत असतात. उदाहरणार्थ दोन प्लेट चिकन थाळीवर एक प्लेट बिर्याणी फ्री. हॉटेल चालकांकडूनही मटणाला यावर्षी खूप मोठी मागणी होती. या मांसाहारी पदार्थांचे भाव या काळात वाढलेले असतात.

श्रावण महिन्याच्या सणावारांमध्ये महिलावर्ग मात्र व्यस्त असतो. एका पाठोपाठ अनेक सण असतात. यात विशेषत्वाने माहेरी भेट देण्याची संधी मिळणाराही सण असतो. एकंदरीत श्रावण हा महिना नवचैतन्याचा असतो. सृष्टीने हिरवा शालू पांघरलेला असतो, रिमझिम बरसात होत असते आणि येणार्या सणावारांमुळे वातावरणामध्ये एक प्रकारची भाविकता भरून असते.

# रा. सु. गवई संयम ,समता आणि न्यायाचा आवाज



आज २५ जुलै रोजी आपण माजी राज्यपाल, नामवंत राजकारणी आणि सामाजिक समतेचे महान प्रवर्तक रा.सु. गवई यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या संघर्षमय व प्रेरणादायी जीवन कार्याचे पुनः स्मरण करत आहोत .आपल्या संयमी शांत आणि समन्वयवादी नेतृत्वाने त्यांनी भारतीय राजकारणाला एक वेगळी दिशा दिली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी प्रभावित होऊन त्यांनी लहानपणापासूनच समाजकार्यासाठी योगदान देण्याचे ठरवले शिक्षण घेऊन सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात त्यांनी कार्यरत राहण्याची दिशा निवडली.

दादासाहेब गवई हे भारतीय रिपब्लिकन पक्षाचे एक प्रमुख नेते होते महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य म्हणून १९६४ ते १९९४ अशी सलग तीस वर्षे त्यांनी काम पाहिले राज्यसभेचे उपसभापती आणि नंतर सभापती या पदावरही त्यांनी अत्यंत संयम आणि तटस्थपणे काम पाहिले .त्यांच्या संयमी कार्यशैलीमुळे सर्वपक्षीय आमदार मिळविणारे नेते म्हणून त्यांची ओळख होती .

दादासाहेब अजातशत्रू राजकारणी होते .१९९८ मध्ये अमरावती लोकसभा मतदारसंघातून ते संसद सदस्य म्हणून निवडून आले २००० मध्ये ते राज्यसभेचे सदस्य झाले.

रा.सू. गवई हे केवळ राजकारणापुरते मर्यादित राहिले नाहीत तर समाजातील वंचित मागासवर्गीय आणि अनुसूचित जातींसाठी त्यांनी आयुष्यभर काम केले. ते बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे खरे अनुयायी होते .त्यांनी अनेक सार्वजनिक व्यासपीठांवरून जातीय विषमता अस्पृश्यता आणि सामाजिक अन्यायाचा कठोर शब्दात निषेध केला. २००६ नंतर त्यांनी बिहार आणि केरळ राज्यांचे राज्यपाल म्हणून जबाबदारी पार पडली. प्रशासनात पारदर्शकता आणि संविधानिक मूल्य टिकवून ठेवण्याचा त्यांनी सदैव प्रयत्न केला .राज्यसभेचे सदस्य असताना त्यांनी अरुण शौरी यांचे वर्शिपिंग फॉल्स गॉड्स हे डॉ.आंबेडकरांवर अवमानकारक भाष्य करणारे पुस्तक राज्यसभेत प्रत्यक्ष फाडून निषेध नोंदविला हा प्रसंग त्यांच्या आंबेडकरी श्रद्धे प्रती असलेल्या तळमळीचे प्रतीक मानला जातो.

दादासाहेब गवई यांच्या नेतृत्वाची खासियत म्हणजे संयम शिस्त आणि सर्व समावेशकता कोणतीही टीका किंवा राजकीय विरोध शांततेने पचवणे हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य होतं. यामुळेच विरोधी पक्षांनाही त्यांच नेतृत्व मान्य होतं.

त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना अनेक राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय पुरस्कार मिळाले त्यांचे योगदान कायम स्मरणात राहावे म्हणून अनेक शाळा संस्था आणि सार्वजनिक स्थळांना त्यांचे नाव देण्यात आले आहे.

आज त्यांचा स्मृतिदिन आहे पण रा.सू. गवई हे केवळ एक व्यक्ती नव्हते ते एक विचार होते जे आजही हजारो तरुणांना सामाजिक समतेसाठी लढण्याची प्रेरणा देतात त्यांच्या संयमी आणि न्यायप्रिय नेतृत्वाचे स्मरण करताना आपण त्यांच्या विचारांची ज्योत नव्या पिढीत पोहोचवणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

डॉ.ज्योती ठाकरे( केचे)
९४२१७३९७५३

# जेवणानंतर तोंडात वेलची टाकण्याचे हे फायदे तुम्हाला माहित आहेत का?

**दि.२५ विदर्भ प्रजासत्ताक**




भारतीय स्वयंपाकघरातील मसाले केवळ जेवणाची चवच वाढवत नाहीत, तर ते शतकानुशतके प्रभावी औषध म्हणूनही वापरले जात आहेत. या मसाल्यांच्या राणीपैकी एक म्हणजे 'हिरवी वेलची' गोड पदार्थांचा सुगंध वाढवणारी आणि बिर्याणीची शान असलेली ही वेलची आरोग्यासाठीही एक खजिना आहे. अनेक घरांमध्ये जेवणानंतर वेलची खाण्याची परंपरा आहे. पण या सवयीमुळे शरीराला नेमका फायदा होतो की नुकसान? चला, याबद्दल सविस्तर जाणून घेऊया.



जेवणानंतर वेलची खाण्याचे फायदे

जेवणानंतर एक किंवा दोन वेलची चघळणे हे केवळ एक चांगला 'मुखवास' नाही, तर त्याचे अनेक आरोग्यदायी फायदे आहेत.

पचनक्रिया सुधारते: वेलची हा पचनासाठीचा एक उत्तम नैसर्गिक उपाय आहे. जेवणानंतर वेलची खाल्ल्याने पोटातील पाचक रसांची निर्मिती वाढते. यामुळे गॅस, अपचन, पोट फुगणे आणि सिडिटी यांसारख्या समस्यांपासून आराम मिळतो. जड जेवण पचवण्यासाठी हे विशेषतः फायदेशीर आहे.

तोंडाची दुर्गंधी दूर होते: वेलची एक उत्कृष्ट नैसर्गिक माऊथ फ्रेशनर आहे. तिच्यातील सुगंधी तेल तोंडात दुर्गंधी निर्माण करणाऱ्या जीवाणूंना मारतात. कांदा किंवा लसूण खाल्ल्यानंतर येणारा तोंडाचा वास घालवण्यासाठी वेलची हा एक प्रभावी उपाय आहे.

सिडिटीपासून आराम: वेलचीमध्ये काही असे घटक असतात, जे पोटातील आम्ल (-ळळव) शांत करण्यास मदत करतात. यामुळे जेवणानंतर होणारी जळजळ आणि सिड रिफ्लक्सचा त्रास कमी होतो.

चयापचय क्रियेला चालना: काही अभ्यासानुसार, वेलचीचे सेवन केल्याने चयापचय क्रिया सुधारते, ज्यामुळे शरीराला अन्नातून पोषक तत्वे शोषून घेण्यास मदत मिळते.

# शेतकरी उत्पादक गट, कंपन्या व सहकारी संस्थासाठी ऊस विकास योजना; कसा घ्याल लाभ?

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक**

राज्यात उसाखाली सरासरी ११.६७ लाख हेक्टर क्षेत्र असून सरासरी उत्पादकता ९० मे. टन प्रति प्रति हेक्टर आहे. सन २०२४-२५ मध्ये ऊस पिकाचा उत्पादन खर्च कमी करणे.ऊस उत्पादकतेत वाढ करण्याच्या दृष्टीने राज्यात अन्न व पोषण सुरक्षा-व्यापारी पिके कार्यक्रमांतर्गत ऊस विकास योजना कार्यक्रम राबविण्यात आलेला आहे.योजनेंतर्गत एक डोळा पध्दत पट्टा पध्दतीचा अवलंब करुन आंतरपीक प्रात्यक्षिके, ऊती संवर्धित रोपांची निर्मिती, मनुष्यबळ विकास, पीक संरक्षण औषधे व बायो-एजंटसचे वितरण हे घटक राबविण्यात आले आहेत.ऊती संवर्धनामुळे ऊसाच्या सुधारित वाणांची निरोगी रोपे तयार करुन ठिकठिकाणी त्यापासून बेणे मळे तयार करणे सुलभ होते.

**योजनेची उद्दिष्टे**

१) ऊसाच्या उत्पादन खर्चात बचत करुन उत्पादकता वाढविणे.

२) दर्जेदार बेण्याच्या वापरास प्रोत्साहन देणे यासाठी उती संवर्धित बेणे निर्मिती करून शेतकऱ्यांना अनुदानावर उपलब्ध करुन देणे.

३) विकसित तंत्रज्ञानाच्या प्रसारासाठी क्षेत्रिय स्तरावर आंतरपिकाची प्रात्यक्षिके आयोजित करणे.

**समाविष्ट जिल्हे**

१) नंदूरबार २) अहिल्यानगर ३) सोलापूर ४) कोल्हापूर ५) जालना ६) बीड ७) लातूर ८) धाराशिव

**समाविष्ट बाबी व अनुदान दर खालीलप्रमाणे**

एक डोळा पट्टा पध्दतीचा अवलंब व आंतरपिक प्रात्यक्षिके – रु. ९,०००/हे.

मुलभूत बियाणे उत्पादनासाठी अर्थसहाय्य (कृषी विद्यापीठ प्रक्षेत्र) – रु.४०,०००/हे.

ऊती संवर्धित रोपे – रु. ३.५०/रोप.

पीक संरक्षण औषधे व बायो-एजंटसचे वितरण – रु. ५००/हे.

राज्यस्तरीय अधिकारी/ कर्मचारी प्रशिक्षण – रु. ४०,०००/ प्रशिक्षण.

पाचट व खोडवा व्यवस्थापन प्रात्यक्षिके – रु. ६,०००/हे.




शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

सुपरकेन नर्सरी – रु. १०,०००/हे.

लाभार्थी

नोंदणीकृत शेतकरी उत्पादक गट, शेतकरी उत्पादक कंपनी व कृषी क्षेत्रात काम करणारी सहकारी संस्था इ.

**कसा कराल अर्ज?**

गट लाभार्थ्यांना महाडीबीटीच्या https://mahadbt.maharashtra.gov.in/Farmer/-griLogin/-सीळडेसळप या वेबसाईटद्वारे अर्ज सादर करता येऊ शकतो. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य (FCFS) या तत्वावर लाभार्थी निवड करण्यात येणार आहे.

# परिचारिकांचा संप मिटला; 'परिचारिका' ऐवजी आता 'परिचर्या अधिकारी'

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती** परिचारिका संघटनांनी पदनामात बदल करण्यासह अन्य मागण्यांसाठी पुकारलेला संप गुरुवारी सातव्या दिवशी अखेर मागे घेतला. पदनामात 'स्टाफ नर्स' ऐवजी 'नर्सिंग ऑफिसर' असा बदल करण्याची त्यांची मागणी राज्याच्या वैद्यकीय शिक्षण विभागाने मान्य केली आहे. महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटनेच्या उपाध्यक्ष हेमलता गजबे म्हणाल्या की, आमच्या मागण्या वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ आणि सचिव धीरज कुमार यांनी मान्य केल्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. बैठकीच्या इतिवृत्तातील नोंदीनुसार आमच्या मागण्यांवर कार्यवाही होईल, अशी अपेक्षा आहे. मागण्या मान्य झाल्याने संप मागे घेतला असून, परिचारिका कामावर रूजू झाल्या आहेत. राज्यातील



परिचारिकांनी गुरुवारपासून संप पुकारला होता. अखेर सात दिवसांनी सरकारने संघटनेच्या मागण्या मान्य केल्याच्या बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत संघटनेला दिल्यानंतर संप मागे घेण्यात आला. परिचारिकांच्या संपामुळे नियमित शस्त्रक्रिया बंद पडल्या होत्या. मुंबईतील जे. जे., कामा, सेंट जॉर्जेस आणि जीटी रुग्णालयातील नियमित शस्त्रक्रिया पूर्णपणे बंद होत्या. केवळ अतितत्काळ शस्त्रक्रिया करण्यात येत होत्या.

# मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाच्या सहाय्याने बालकाची यशस्वी शस्त्रक्रिया

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती-** राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमाअंतर्गत वडगांव तालुका, अचलपूर येथील वीरेंद्र प्रफुल्ल कंटाळे, (वय -अडीच वर्षे ) या बालकाची अतिशय अवघड शस्त्रक्रिया अमरावती येथील एका खाजगी रुग्णालयात यशस्वीरित्या पार पडली. या शस्त्रक्रियेला लागणारा संपूर्ण निधी हा जिल्हास्तरावरील कार्यरत असलेल्या मुख्यमंत्री सहायता निधी कक्षामार्फत देण्यात आला. नागपूरच्या तज्ज्ञ डॉक्टरांद्वारे ही शस्त्रक्रिया करण्यात आली. यासाठी बालकाचे वडील प्रफुल्ल कंटाळे यांनी शासनाचे आभार मानले.

राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमाअंतर्गत ० ते १८ या वयोगटातील मुलांची आरोग्याची तपासणी करण्यात येते. या तपासणीमध्ये शस्त्रक्रियेसाठी संदर्भित बालके निघतात, त्यांच्यावर उपचार करण्यात येतात. राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत करण्यात आलेल्या तपासणीमध्ये वीरेंद्रच्या पायाचा त्रास लक्षात आला. या त्रासामुळे त्याला मांडी घालून बसता येत नव्हते. यामुळे त्याच्यावर तातडीने शस्त्रक्रिया करण्यात आली. या शस्त्रक्रियेसाठी लागणारा सुमारे एक लक्ष रुपयांचा निधी मुख्यमंत्री सहायता निधी कक्षामार्फत देण्यात आला. वीरेंद्रला रुग्णालयातून सुटी देण्यात आली असून पुढील



वैद्यकीय उपचार सुरू आहेत.

अमरावती मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे डॉ. श्याम गावंडे तसेच डॉ सुषमा सावलकर , राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम पथक, अचलपूर व कर्मचारी यांच्या सततच्या प्रयत्नांमुळे तातडीने ही शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. २५ जुलै २०२५

शहर/ग्रामिण



# प्रतिबंधित प्लास्टिकवर मनपाची धडाकेबाज कारवाई

## गवळीपुरा व इतवारा बाजारात १८२० किलो प्लास्टिक जप्त



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

अमरावती महानगर पालिकेच्या वतीने आज गवळीपुरा व इतवारा बाजार परिसरात प्रतिबंधित प्लास्टिकच्या वापरावर जोरदार कारवाई करण्यात आली. मा. अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रत्यक्ष उपस्थितीत ही धडक मोहीम पार पडली.या मोहिमेदरम्यान बाजारातील अनेक दुकाने व गाळेधारकांकडून प्लास्टिकच्या थैली, कप, प्लेट यांसारख्या प्रतिबंधित वस्तू जप्त करण्यात आल्या. विशेष म्हणजे, अज्जु खान व सुजान खान (रा. गवळीपुरा) यांच्याकडील दुकाने भाड्याने दिली असून, पवन आणि जुबेर खान या भाडेकरूंनी ते गोडाऊन म्हणून वापरत होते. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित प्लास्टिक साहित्य साठवले असल्याचे आढळून आले.एकूण १८२० किलो प्रतिबंधित प्लास्टिक जप्त करण्यात आले असून, २ ट्रक भरलेले साहित्य ताब्यात घेण्यात आले आहे.

प्लास्टिक बंदी कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी संबंधित विक्रेत्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.ही मोहीम महानगरपालिकेच्या स्वच्छता व पर्यावरण विभागाने संयुक्तपणे राबवली.कारवाईदरम्यान अतिक्रमण पथक प्रमुख योगेश कोल्हे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी जाधव साहेब व त्यांचे सहकारी, नोडल अधिकारी तथा स्वच्छता निरीक्षक विकी जेधे, ज्येष्ठ स्वास्थ निरीक्षक विजय बुरे, स्वास्थ्य निरीक्षक श्री. कुलकर्णी व सचिन सैनी, अतिक्रमण विभागाचे कर्मचारी तसेच पोलीस पथक उपस्थित होते.मनपा प्रशासनाने नागरिकांना पर्यावरणपूरक पर्यायांचा अवलंब करण्याचे आवाहन केले असून, प्लास्टिकच्या वापराविरोधात अशाच कठोर मोहिमा भविष्यातही राबविल्या जाणार असल्याचे स्पष्ट केले आहे. या कारवाईमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. अमरावती महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी आज गवळीपुरा व इतवारा बाजार परिसरात पार पडलेल्या धडक



कारवाईदरम्यान नागरिकांना स्पष्ट शब्दांत आवाहन केले की, प्लास्टिकचा वापर केवळ कायद्यानेच नव्हे, तर आपल्या पर्यावरणाच्या दृष्टीने देखील घातक आहे. प्रतिबंधित प्लास्टिकचा साठा करणे किंवा वापरणे हा गंभीर गुन्हा असून, अशा प्रकारांवर मनपा कठोरपणे कारवाई करत राहणार आहे. नागरिकांनी आणि व्यावसायिकांनी स्वयंस्फूर्तीने प्लास्टिकचा वापर थांबवावा व पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारावेत.त्यांनी पुढे सांगितले की, स्वच्छ, आरोग्यदायी व सुरक्षित अमरावतीसाठी आपण सर्वांनी एकत्र येणे गरजेचे आहे. ही केवळ महानगरपालिकेची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. पुढील काळात अशा कारवाया अधिक व्यापक प्रमाणात केल्या जातील. त्यामुळे कोणतीही दया दाखवली जाणार नाही.प्लास्टिकमुक्त अमरावती ही आपल्या सगळ्यांची सामूहिक जबाबदारी आहे, असे सांगून त्यांनी सर्व विक्रेते, दुकानदार व नागरिकांना यामध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले.

# ब्राह्मण बिझनेस नेटवर्क ग्लोबल असोसिएशनची पहिली ग्लोबल मीटिंग २७ जुलैला ऑनलाईन

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२५पुणे –** ब्राह्मण उद्योजकांना एकत्र आणून जागतिक स्तरावर व्यवसायवाढीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या ब्राह्मण बिझनेस नेटवर्क ग्लोबल असोसिएशनची पहिली ग्लोबल व्हर्च्युअल मीटिंग येत्या २७ जुलै २०२५ रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत झूम प्लॅटफॉर्मवर आयोजित करण्यात आली आहे.

या ऑनलाईन बैठकीस इइछत्रः चे संस्थापक अध्यक्ष श्री श्रीपाद कुलकर्णी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून, असोसिएशनच्या उद्दिष्टांबाबत व भविष्यातील योजना यावर ते आपले विचार मांडतील.तसेच न्यूझीलंड येथून रवी खिरे




हे गेस्ट स्पीकर म्हणून सहभागी होणार असून, न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया व पॅसिफिक क्षेत्रातील भारतीय व्यवसायिकांसाठीच्या संधी व धोरणांवर ते मार्गदर्शन करणार आहेत.या बैठकीत डॉ. दीप्ती देशपांडे ह्यांचे विशेष बिझनेस प्रेझेंटेशन देखील होणार आहे.भारतासह विविध देशांतील ब्राह्मण उद्योजक या महत्त्वपूर्ण बैठकीस नो वर एकत्र येणार असून, उद्योजकांसाठी ही एक सशक्त नेटवर्किंगची संधी ठरणार आहे.या ऐतिहासिक ग्लोबल मीटिंगमध्ये सहभागी होण्यासाठी सर्वांना आवाहन करण्यात येत आहे.नो लिंक व अधिक माहितीसाठी:व्हर्च्युअल चॅप्टर हेड – नितीन बेळे (मो. ९८५०८ २२१३८)यांनी केल आहे.

# सर्पमित्रांसाठी सरकार मोठा निर्णय घेणार महसूल मंत्री बावनकुळे दिली माहिती



## महसूल मंत्री बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५मुंबई:–** सर्पमित्र हे ग्रामीण व शहरी भागात सापांपासून नागरिकांचे प्राण वाचविण्याचे काम करतात. या सर्पमित्रांना स्वतंत्र ओळख मिळावी, तसेच त्यांच्याबाबतीत काही दुर्घटना घडल्यास त्यांना अथवा कुटुंबियांना अपघाती विमासारखी आर्थिक भरपाई मिळावी यासाठी वन विभागाच्या माध्यमातून मुख्यमंत्र्यांकडे शिफारस केली जाईल, त्यांच्या मागण्यांबाबत सकारात्मक विचार करण्यात येईल, असे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

सर्पमित्रांच्या विविध मागण्यांसंदर्भात महसूल मंत्री बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक झाली. यावेळी वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, राज्य वन्यजीव संरक्षक एम श्रीनिवास राव यांच्यासह अखिल भारतीय सर्पमित्र व प्राणीमित्र संघटनेचे अध्यक्ष प्रा. डॉ. संभाजी पाटील आणि प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी सर्प मित्रांच्या वतीने वेगवेगळ्या मागण्या सरकारकडे करण्यात आल्या.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, सर्पमित्रांना दुर्घटनेत मृत्यू आल्यास १० ते १५ लाखांपर्यंत विमा भरपाई मिळावी यासाठी वन विभागामार्फत मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून निर्णय घेण्यात येईल. सर्पमित्रांना काम करताना अडचण येऊ नये यासाठी त्यांचे पोलीस व्हेरिफिकेशन आणि त्यांच्यासाठी मार्गदर्शक सूचना तयार करुन त्यांना ओळखपत्र मिळावे यासाठी सरकारचे प्रयत्न असतील.

आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत फ्रंट लाइन वर्कर म्हणून सर्पमित्रांना मान्यता मिळावी, सर्पमित्रांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध व्हावी या दृष्टीने स्वतंत्र पोर्टल तयार करावे, आदी बाबींसंदर्भात सकारात्मक विचार करुन त्याअनुषंगाने वन विभागाला निर्देश देण्यात येतील, असे ही बावनकुळे यांनी सांगितले. सर्पमित्रांनी वन्यजीव कायद्याचे काटेकोर पालन करावे, असे राज्य वन्यजीव संरक्षक एम. श्रीनिवास राव यांनी यावेळी सांगितले.

# भाविकांची होणार दर्शनासाठी गर्दी, दर सोमवारी शिवपिंडीला फुलांची सजावट

## मंदिरे सजली, ठिकठिकाणी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अकोला–** अकोल्याचे श्री राजराजेश्वर शहराचे आराध्य दैवत म्हणून ओळखले जाते. यामुळे श्रावण महिन्यात शहरातील श्री राजराजेश्वर मंदिरात भक्तीचा मळा फुलणार आहे. श्री राजराजेश्व येथील भव्य शिवलिंगाच्या दर्शनासाठी दूरवरून शिवभक्तांची गर्दी असते. त्यानिमित्त श्री राजराजेश्वर मंडळाच्या वतीने जय्यत तयारी करण्यात आली आहे.शुक्रवारी, २५ जुलै रोजी श्रावण महिन्यास प्रारंभ होणार आहे. यंदा श्रावण महिन्यात चार श्रावण सोमवार आले असून, चारही श्रावण सोमवारी श्री राजराजेश्वर मंदिरातील शिवपिंडेला आकर्षक फुलांची सजावट करण्यात येणार आहे. मंदिरात सकाळी रुद्राभिषेक, पूजा, आरती असे धार्मिक विधी होणार आहेत. मंदिरात भाविकांची होणारी गर्दी लक्षात भाविकांसाठी स्वतंत्र दर्शनरांगेची व्यवस्था केली जात आहे. त्यासाठी बॅरिकेड्सची व्यवस्था केली जात आहे.याशिवाय शहरातील बारा ज्योर्तिलिंग मंदिर परिसरातही भाविकांची मोठी गर्दी होते. या मंदिर परिसरालाही सजविण्यात आले आहे. परिसरात दुकान लागायला सुरुवात झाली आहे. गुरुवारीही येथे दर्शनासाठी भाविकांनी मोठ्या संख्येत हजेरी लावली होती. येथील शिवलिंगालाही प्रत्येक श्रावण सोमवारी सजविण्यात येणार आहे. तसेच जिल्ह्याभरातील विविध मंदिरामध्ये शिवभक्तींचा उत्साह महिनाभर पहावयास मिळणार आहे. अकोला येथे बार्शीटाकळ येथील खोलेश्वर, मूर्तिजापूर येथील लक्षेश्वर मंदिरामध्ये मोठ्या प्रमाणात श्रावण सोमवारी जत्रेचे स्वरूप येते. महिनाभर भाविकांकडून स्थानिक शिवपिंडेला जलाभिषेक करण्यात येईल.शिवर येथील श्री शिव मंदिरात विविध कार्यक्रम शिवर येथील श्री शिव मंदिरात श्रावण महिन्याच्या निमित्ताने महादेवाच्या पिंडीच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी होईल. मंदिर परिसरात सध्या भक्तिमय वातावरण अनुभवायला मिळत आहे. पवित्र मासानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. श्रावण महिन्यातील तिसऱ्या सोमवारी गावातील शिव चॅरिटेबल ट्रस्ट आणि शिवभक्त मंडळाच्या वतीने भव्य कावड यात्रेचे आयोजन करण्यात येते. गांधीग्राम येथील पूर्णा नदीच्या पात्रातून कावडीने पवित्र जल आणले जाते आणि त्या जलाने गावातील मंदिरातील मूर्तींचा जलाभिषेक केला जातो. या कावड यात्रेचा समारोप शिव मंदिरात होतो. याप्रसंगी शिव चॅरिटेबल ट्रस्टतर्फे कावडधारी शिवभक्तांचा विशेष सत्कार करण्यात येतो आणि महाप्रसादाचेही आयोजन केले जाते.



# श्रावण महिन्याच्या सुरुवातीलाच नारळाचे दर गेले ५० रुपयांवर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती–** सण, उत्सवाचा महिना श्रावण शुक्रवार, २५ जुलैपासून सुरू होत आहे. तत्पूर्वीच प्रत्येक पूजेसाठी आवश्यक असलेले नारळाचे दर मात्र अचानक २० रुपयांनी वाढून ते ५० रुपयांवर पोहोचले आहेत. श्रावणात सोमवारी महादेवाला अर्पण करण्यासाठी तसेच विविध पूजा करताना सण, उत्सवात सुक्या व ओल्या नारळाची आवश्यकता असते. त्यामुळेच श्रावण महिन्यापासून ते दिवाळीपर्यंत नारळाला मोठ्या प्रमाणात मागणी असते. श्रावण आटोपला की गौरी गणपती, शारदीय नवरात्रोत्सव, दसरा, दिवाळी असे मोठे सण आहेत. नेमकी हिच संधी साधून अचानक २० रुपयांनी नारळाचे भाव वाढवण्यात आलेत. मागणी जास्त व आवक मर्यादित असल्यामुळे नारळाचे भाव वाढल्याची माहिती किराणा दुकानदारांनी दिली. ओल्या नारळाची साल व वाळलेल्या नारळाची साल काढली असेल तर त्यासाठी १० रु. जास्त मोजावे लागतात.

गेल्या वर्षी श्रावण महिन्यात ओले व सुके नारळ हे आकारानुसार २५ ते ३० रुपये दराने मिळायचे. २०२३ च्या श्रावण महिन्यात ओल्या व सुक्या नारळाचे दर २० रुपये होते. २०२४ मध्ये



ते ५ ते १० रुपयांनी वाढले. यंदा तर त्यात अचानक दुप्पटीने अर्थात २० रुपयांनी वाढल्याने देवाला नारळ चढवणेही आता महाग झाल्याच्या सर्वसामान्यांच्या प्रतिक्रिया आहेत. मंदिरात गेल्यानंतर देवाला अर्पण करण्यासाठी तसेच महिलांना ओटी भरण्यासाठी नारळाची आवश्यकता असते. कोणत्याही पूजेचा श्रीगणेशा करताना कलश स्थापना करावी लागते. कलशात नारळाची आवश्यकता असते. सत्यनारायण कथा, व्रत वैकल्ये यासाठीही नारळाशिवाय भागत नाही. मात्र, आता नारळाचे दर वाढल्याने भाविकांना नारळ खरेदी करण्यासाठी जास्त पैसे खिशात ठेवावे लागतील.

नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन, कृष्ण जन्माष्टमी, नागपंचमी या सणाला नारळाशिवाय पुजाच होत नाही. त्यामुळे सर्वसामान्यांना नारळ खरेदी करण्यासाठी खिशातून जास्त पैसे मोजावे लागणार आहेत.–

# तिन्ही निवडणुका एकत्र घेता येतील का याची चाचपणी

## राज्य निवडणूक आयुक्तांनी ईव्हीएम, मनुष्यबळाचाही घेतला आढावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती–** आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका एकत्रित घेता येतील का, याची चाचपणी राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी केली. त्यासाठी लागणारे मनुष्यबळ आणि ईव्हीएमची उपलब्धता याचाही त्यांनी आढावा घेतला. शिवाय निवडणुका मुक्त आणि निर्भय वातावरणात पार पडण्यासाठी प्रशासकीय यंत्रणांनी अचूक नियोजन करून ठेवावे, असे निर्देशही दिले.

राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी गुरुवारी येथे विभागातील पाचही जिल्हाधिकाऱ्यांची बैठक घेतली. विभागीय आयुक्तालयाच्या सभागृहात पार पडलेल्या या बैठकीला राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणी, विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल, राज्य निवडणूक आयोगाचे विशेष कार्य अधिकारी अ. गो. जाधव, जिल्हाधिकारी आशिष येरेकर,



विभागातील पाचही जिल्हाधिकारी हजर

अजित कुंभार (अकोला), डॉ. किरण पाटील (बुलडाणा), बुवनेश्वरी एस. (वाशीम), यवतमाळचे प्रभारी जिल्हाधिकारी अनिल खंडागळे, उपायुक्त संतोष कवडे यांच्यासह पाचही जिल्ह्यांचे जिल्हा परिषद व नगरपालिका प्रशासनाचे वरिष्ठ अधिकारी या वेळी उपस्थित होते.जिल्हा परिषद, महापालिका व नगरपालिकांच्या निवडणुका एकत्र घेण्याबाबत आयोग शक्यता तपासून पाहात आहे. अर्थात या निवडणुकांसाठीचे मतदान जरी एकाच दिवशी घेता आले नाही, तरी एका मागोमाग एक घेऊन किमान मतमोजणी एकाचवेळी करून निकाल घोषित करता यावा, असे नियोजन केले जात आहे. त्यासाठी आवश्यक त्या बाबी आयुक्त वाघमारे यांनी जाणून घेतल्या. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी नियोजन करताना वाढलेल्या मतदारांची संख्या लक्षात घेऊन मतदान केंद्राची संख्या तसेच मनुष्यबळ ठरावावे. मतदान केंद्रावर महिला निवडणूक अधिकारी-कर्मचारी व मतदारांसाठी पिण्याच्या पाण्याची, स्वच्छतागृहाची सुविधा करण्यात यावी. दिव्यांग मतदारांसाठी रॅम्प, व्हीलचेअर आदी सुविधांची उपलब्धता प्रत्येक मतदान केंद्रांवर करून ठेवावी. मतदान केंद्रावर मतदारांसाठी प्रशासनाने सुविधा न केल्याने मतदानाचा टक्का कमी झाला, अशी तक्रार येता कामा नये. संवेदनशील मतदान केंद्रावर कडक पोलिस बंदोबस्त व सीसीटीव्ही यंत्रणा बसवण्यात यावी, अशा सूचनाही त्यांनी केल्या. ईव्हीएम उपलब्धता यादृष्टीने जिल्ह्यांनी सर्वप्रथम त्यांच्याकडील मशीनची प्रथम स्तर तपासणी (एफएलसी) करून घ्यावी व त्या अनुषंगाने कंट्रोल युनिट, बॅलेट युनिट व अनुषंगिक बाबींची दुप्पट प्रमाणात उपलब्धता करण्यात यावी. ज्या जिल्ह्यात अधिक इव्हीएम असेल त्यांनी लगतच्या जिल्ह्यांची मागणी पूर्ण करावी.

निवडणुकीचे कामकाज करण्यासाठी लागणारे अधिकारी, कर्मचाऱ्यांची कमतरता पूर्ण करण्यासाठी आयोगाला त्यासंदर्भात एकत्रित मनुष्यबळाची मागणी कळवण्यात यावी, अशा सूचना देखील आयुक्त वाघमारे यांनी यावेळी दिल्या.

# परशुराम पुरस्कार वितरण समारंभ थाटात: अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ यांचा परशुराम रत्न', गुणवंत विद्यार्थी गौरव आणि परशुराम झांकी पुरस्कार' समारंभ ब्राह्मण सभागृह, दरोगा प्लॉट, राजापेठ, अमरावती येथे संस्थापक अध्यक्ष जयंत ओक यांच्या अध्यक्षतेखाली झाला. या समारंभात मोहन काटे, डॉ. सतीश तिवारी, अमित सोनी, डॉ. शशांक दुबे, डॉ. मोना चिमोटे आदी मान्यवर उपस्थित होते.

या समारंभात सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, क्रीडा, संगीत या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना ''परशुराम रत्न पुरस्कार'' प्रदान करण्यात आले. पुरस्काराचे स्वरूप स्मृतीचिन्ह, शाल, श्रीफळ असे होते. यावेळी इयत्ता दहावी आणि बारावीमध्ये ८० टक्के पेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांना स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच भगवान श्री परशुराम शोभा यात्रेत तन, मन आणि धनाने सेवा करणाऱ्या सन्माननीय सदस्यांना परशुराम सेवा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या मालिकेत अमित सोनी, ड., प्रशांत देशपांडे, सारिका दीप मिश्रा, डॉ. सतीश तिवारी, विजय खंडेलवाल, नितीन अंबुलकर, डॉ. कपील जडिया, कीर्तीदीप सराफ, देवदत्त जोशी, राजेश चौबे, आशिष मिश्रा, श्याम शर्मा, रेखा शर्मा, निशा मिश्रा, जितेंद्र शर्मा, अल्का शर्मा, शैलेंद्र मिश्रा, कृष्णा शुकला, दिपाली काळे आणि मिरवणुकीत स्टॉल सेवा देणाऱ्या माजी नगरसेवक रश्मी नावंदर, रघुवीर स्वीट्सचे संचालक दिलीप पोपट, दीपक मानका, वैद्यकीय तपासणी शिबिरात मदत करणारे डॉ. यश पाठक, डॉ. नम्रता दुबे, डॉ. वराह जोशी तसेच खाटुश्याम भजन संध्या गायक जय जोशी, दीपक उपाध्याय, मयंक छांगाणी, रवी ओझा, अक्षिता पांडे तसेच कार्यक्रमाच्या आयोजनासाठी सभागृह




उपलब्ध करून देणारे ऍड. सचिन देवरणकर व दिलीप गणोरकर यांचा देखील सत्कार करण्यात आला. अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ विदर्भ प्रांत अध्यक्ष रमेश छांगाणी, जिल्हा अध्यक्ष डॉ. शशांक दुबे, शहराध्यक्ष प्रवीण जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली हा समारंभ आयोजित करण्यात आला होता. समारंभाच्या यशस्वी आयोजनासाठी नितीन अंबुलकर, प्रवीण अंबुलकर, राजू देव, राजकुमार तिवारी, विक्की शर्मा, ॲड. आदित्य शुक्ला, रेवती देशपांडे, डॉ. ॲड. नमिता तिवारी, दीपाली काळे यांनी अथक परिश्रम घेतले. समारंभाचे संचालन प्रियंका महाजन, रोहिणी केदार, निकिता शुक्ला, स्वप्ना दुबे यांनी केले. आभार स्वाती डांगे यानी केले. या समारंभात शेकडो ब्राह्मण समाज बांधव उपस्थित होते.

समाजाने एकजूट राहून पुढे जावे : मोना चिमोटे : राज्यातील ब्राह्मण समाजात भाषेबाबत कोणतेही मतभेद नसावेत, भविष्यात समाजाने एकजूट राहून पुढे जावे, तरच समाजाला इच्छित नेतृत्व मिळेल, यासोबतच समाजातील तरुण पिढीला पुढे जाण्याची संधी मिळेल. आज समाजातील तरुण विविध क्षेत्रात आपले नशीब आजमावण्याचा प्रयत्न करत आहेत. समाजातील पारंपारिक व्यवसाया व्यतिरिक्त ते इतर व्यवसायांमध्ये रस दाखवत आहेत. समाजातील पारंपारिक व्यवसायानेही पुढे जाण्याचा प्रयत्न केला पाहिजे, त्यासाठी आपल्याला आपल्या मुलांना शिक्षित करावे लागेल. संस्कृती आणि पारंपारिक व्यवसायाकडे त्यांच्यात विश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न करावा लागेल असे प्रतिपादन डॉ. मोना चिमोटे यांनी केले.

# दर्यापूर नगरपालिकेला प्राप्त सात कोटींचा निधी अखर्चित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५दर्यापूर** स्थानिक नगरपालिकेला सात कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाल्याची माहिती आहे परंतु तो निधी अखर्चित असल्यामुळे विकास कामांकडे मुख्याधिकारी लक्ष देणार का? असा सवाल नागरिक करीत आहे. शहरातील रस्ते, नाल्या व इतर महत्त्वपूर्ण कामासाठी निधी उपलब्ध असतानाही कामे मार्गी लागली नाहीत ही शोकांतिका आहे. पालिकेला गेल्या तीन-चार महिन्यापासून कायमस्वरूपी मुख्याधिकारी नसल्यामुळेसुद्धा पालिकेतील भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला आहे. या महत्त्वपूर्ण बाबीकडे लोकप्रतिनिधींचे सुध्दा दुर्लक्ष कारणीभूत ठरत आहे. एकीकडे नागरिकांकडून करोडो रुपये टॅक्स पालिका दरवर्षी वसूल करते परंतु विकासाच्या नावाने बोंब आहे. रस्त्यावरील अतिक्रमण, सांडपाण्याचा निचरा न होणे, शहरातील रस्त्यामधील खड्डे, काटेरी झुडपांचीवाढ, घंटागाड्यांची अनियमिता अशा बऱ्याच समस्या जैसे थे आहे. दरम्यान सात



कोटींच्या विकास कामांसाठी खासदार बळवंत

## मुख्याधिकारी विकास कामांना गती देणार का ?

वानखडे यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे सतत पाठपुरावासुद्धा केला आहे. हे असतानासुद्धा विकास कामांना सुरुवात न झाल्याने शहरातील नागरिक आंदोलनाच्या तयारीत असल्याचे समजते. चार महिन्यापासून निविदा उघडून विकास कामे न झाल्याने याची विभागीय आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांनी चौकशी समिती नेमावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.

# इंदूरच्या धर्तीवर दीड महिन्यात साकारणार 'खाऊ गल्ली'साईटचे काम पूर्ण

## लवकरच निविदा मागविणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ अमरावती**

महानगर पालिका इंदूरच्या घर्तीवर प्रशांतनगर येथील उद्यानाच्या बाजुला, मनपा कार्यशाळेलगत बाजोणारा गल्ली सुरू करणार आहे. या साईटचे काम पूर्ण झाले असून येथे १८ दुकानांचे गाळे व कार्यालय आहे. तसेच पुढील प्रशस्त जागेवरही किमान १० स्टॉल्स लावता येतील, अशी सोय असून मधल्या जागेत बसून खवय्यांना विविध प्रकारच्या खाद्यपदार्थांचा आस्वाद घेता येईल, अशी येथे सोग आहे. अर्थात या ठिकाणी चायनीज, भेळ, पाणीपुरी, समोसे, कचोरी, फरसाण, पुलाव अशा



विविध खाद्य पदार्थांचे २८ स्टॉल्स एकाच ठिकाणी असतील.

यामुळे खवय्यांना येथून दुसरीकडे जावे लागणार नाही.प्रशांतनगर उद्यानापुढे अनधिकृतपणे वसलेल्या खाऊ गल्ली मुळे परिसरातील नागरिकांना त्रास व नागरिकांकडून मिळालेल्या तक्रारीनंतर मनपाद्वारे 'खाऊ गली' सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. मनपाची अधिकृत 'खाऊ गल्ली' सुरू झाल्यानंतर सध्या ज्या ठिकाणी अनधिकृत खाऊ गल्ली आहे, तेथे वाहनतळाची व्यवस्था केली जाणार आहे. त्यामुळे रस्त्यावर राहणाऱ्या अस्ताव्यस्त उभ्या वाहनांमुळे होणारा त्रास तर वाचेलच शिवाय खाऊ गल्लीलाही



अधिकृत जागा दिली जाणार असल्याने मनपाचेही उत्पन्न वाढेल. 'खाऊ गल्ली साठी लवकरच निविदा प्रक्रिया राबवली जाणार असून त्यानंतर गाळे वितरित केले जातील, अशी माहिती बाजार परवाना विभागाद्वारे देण्यात आली.९५ हजार चौरस फुट प्रशस्त जागेत ही 'खाऊ गड़ी' सुरू होत आहे. प्रशांतनगर उद्यानाची ही जागा पडीक होती. येथे कचरा, दुर्गधी तसेच साप, बिंबू, सरपटणारे इतर प्राणी मोठ्या प्रमाणात होते.

तत्कालिन कार्यशाळा अधीक्षक उप अभियंता लक्ष्मण पावडे यांनी तत्कालिन आयुक्तांशी चर्चा करून त्यांच्यापुढे येथे खाऊ गल्ली' सुरु करण्याची योजना मांडली. त्याला आयुक्तांनी परवानगी दिल्यानंतर या जागेचे पडिक असलेल्या नुतनीकरण करून उत्तम १८ दुकानांचे गाळे तयार करण्यात आले. सोबतच पुरुष व महिलांसाठी येथे प्रसाधनगृह तयार करण्यात आले असून विद्युत पुरवठ्यासह पाण्याची व्यवस्था करण्याचे काम सध्या प्रगतीपथावर आहे.

ही दोन्ही कामे एक ते दीड महिन्यात पूर्ण करण्याचे निर्देश मनपा आयुक्तांनी दिले आहेत. शनिवार १९ रोजी सकाळी मनपा आयुक्तांनी स्वतः या जागेची पाहणी करून हा उपक्रम शक्य तेवढ्या लवकर सुरु करण्याचे आदेश दिले आहेत. एवढेच नव्हे तर पुढच्या रिक्त जागेत एकसारखे दिसतील, असे स्टॉल्सही लावण्यात यावे, अशी सुचना केली. त्यामुळे ही खाऊ गल्ली' लवकरच आकारास येणार आहे.

त्यामुळे शहरवासीयांना प्रशांतनगर उद्यानात फिरण्यासह 'खाऊ गली' ला भेट देऊन आवडीचे पदार्थ खाता येतील. सोबतच शहरात रोजगारही वाढेल.

### शहरवासीयांच्या सोयीसाठीलवकरच हा उपक्रम सुरू होणार

'खाऊगही' हा शहरवासीयांच्या सोयीसाठी लवकरच चांगला उपक्रम मनपाद्वारे सुरू केला जाणार आहे. शहरात अशी अधिकृत खाऊ मढ़ीची सोय सध्या कुठेही नाही. यामुळे मनपाला उत्पत्रही मिळेल, तसेच नागरिकांचीही सोय होईल वाहनतळाची समस्याही निकाली निघेल.

**सौम्या शर्मा (चांडक), आयुक्त, मनपा,**

# रेल्वे पुलासाठी २५० कोटींची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती** - स्थानिक रेल्वे स्थानक चौकातील विविध मार्गांना जोडणारा पूल धोकादायक प्यारे याठिकाणी नवीन उाणपूल निर्माण करण्यासाठी खासदार डॉ. अमित बोटे यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे २५० कोटी स्पयाची मागणी केली आहे. वैष्णव यांनी त्यांच्या या निवेदनावर सकारात्मक प्रतिसाद देत तातडीने कार्यवाही करण्याच्या सूखना रेल्वे विभागाला दिल्या आहेत.

रेल्वे स्टेशन चौकातील उड्डाणपूलाचे निर्माण हे १९६४ मध्ये करण्यात आले होते. वाढलेल्या नागरीकरणाच्या वाहतुकीचा ताण या पुलावर वाढला आहे. दिवसभरात मोठ्या प्रमाणातील वाहतूक या पुलावरून होते. वाढते शहरीकरण, वाहनांची संख्यालक्षात घेता हा पुल अरुंद असल्याने वाहतुकीची मोठी समस्या निर्माण होते.

शिवाय सार्वजनिक बांधकाम विभागाने हा पूल धोकादायक असल्याचे घोषित केले आहे. पोलीस विभागाकडून अधिसूचनाप्रसिद्ध करत या पुलावरू जड वाहतूक बंद करण्यात आली रेल्वे स्टेशन,राजकमल चौक,मालवीय चौक, हमालपुरा अशा विविध मार्गाना हा पूल जोडतो. त्यामुळे या ठिकाणी वाहतूक व्यवस्था सुरजीत करण्यासाठी नवीन उड्डाणपुल निर्माण करण्याची गरज असल्याची बाब खामदर डॉ. अनिल बोंडे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री



## खासदार डॉ. अनिल बोंडे यांचे रेल्वेमंत्र्यांना निवेदन

अश्विनी वैष्णव यांना लक्षात आणून दिली. बोडे यांनी यासंदर्भातील निवेदन गुरुवारी (ता.२४) मंत्री अश्विनी वैष्ण यांना दिले. दरम्यान त्यांनी या ठिकाणी प्रशस्त अमा उड्डाणपूल उभारल्यास वाहतुकीची समस्या कायमस्वरूपी सुटेल, त्यासाठी रेल्वे विभागाने २५० कोटी रुपयांचा निधी द्यावा, अशी मागणी केली त्यावर वैष्णव यांनी तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना रेल्वे विभागाच्या प्रधान सचिवांना दिल्या.-

# पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय व BOAT यांच्यात ऐतिहासिक सामंजस्य करार

## पोटे अभियांत्रिकेला अमरावती विद्यापीठातून पहिला मान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती-** अमरावती जिल्हा आणि संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या इतिहासात एक महत्त्वाचा टप्पा गाठत, पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड मॅनेजमेंट, अमरावती यांनी बोर्ड ऑफ अँप्रेन्टीसशिप ट्रैनिंग (इज-ढ) या भारत सरकारच्या उपक्रमासोबत सामंजस्य करार (चेण) केला आहे. अशी भागीदारी करणारे हे अमरावती विद्यापीठातून पहिले अभियांत्रिकी महाविद्यालय ठरले आहे.या करारामुळे पोटे महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना इंटर्नशिप, अप्रेंटिसशिप व उद्योगानुभव यांसारख्या व्यावसायिक संधी प्राप्त होतील. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अभ्यासक्रमासह प्रत्यक्ष औद्योगिक अनुभवाची जोड मिळून त्यांचे करिअर अधिक सक्षम व व्यावहारिक होणार आहे.या ऐतिहासिक कराराच्या औपचारिक कार्यक्रमात अनेक मान्यवरांनी उपस्थिती दर्शवली. या वेळी इज-ढ चे सह-संचालक डॉ. पी. एच. उईके, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ येथील रिसर्च आणि इन्क्युबेशन फाउंडेशनचे संचालक डॉ. अजय लाड, पोटे एज्युकेशनल ग्रुपचे संचालक डॉ. पी. एम. खोडके, प्राचार्य डॉ. पी. एम. जावंधिया, उपप्राचार्य डॉ. मोहम्मद झुहैर आणि इंटर्नशिप समन्वयक प्रा. एस. व्ही. मिश्रा प्रामुख्याने उपस्थित होते.सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत चेण चे औपचारिक स्वाक्षरी समारंभ पार पडले. हा उपक्रम विशेषतः अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना उद्देशून राबवण्यात येत असून, त्यांना बाहेरील उद्योग जगतातील प्रत्यक्ष अनुभव देण्याचा प्रयत्न आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अभ्यासक्रमासह प्रत्यक्ष




औद्योगिक अनुभवाची जोड मिळून त्यांचे करिअर अधिक सक्षम व व्यावहारिक होणार आहे. या कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांसाठी शिक्षणातून प्रत्यक्ष औद्योगिक क्षेत्रात पाऊल टाकण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या उपक्रमामुळे केवळ अमरावती नव्हे, तर संपूर्ण विदर्भातील विद्यार्थ्यां साठी दर्जेदार प्रशिक्षण, इंटर्नशिप व रोजगार संधींचे नवीन दालन खुले होणार आहे.

# मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांची बहिरम कुऱ्हा येथे भेट.....









**मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी आज बहिरम कुऱ्हा येथील आप्पाजी महाराज वारकरी ज्ञानपीठ येथे भेट दिली. वारकरी ज्ञानपीठाच्या वतीनेव आ.श्रीकांत भारतीय ,तुषार भारतीय यांच्या वतीने त्यांचे पारंपारिक पद्धतीने स्वागत करण्यात आले. त्यानंतर मंत्री श्री. पाटील यांनी संस्थानातील विठ्ठल - रुक्मिणीच्या मूर्तीचे पूजन केले. यावेळी गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

## सातपुड्याच्या पायथ्याशी आढळला बदामी डोक्याचा राघू; अमरावती जिल्ह्यासाठी पहिली नोंद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५शिंदी बु.**

अमरावती जिल्ह्यातील सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल्या बेलखेड़ा गावानजीक रस्त्याच्या कडेला परतवाडा येथील पक्षी निरीक्षक डॉ. रणजीत चित्रकार याना बदामीडोक्याचा रापू हा पक्षी आढळला व या पक्ष्याच्या घेतलेल्या छायाचित्राद्वारे त्याची खातरजमा केली. अमरावती जिल्ह्याकरिता ही पहिली नोंद असून रापू प्रजातीतील इतर तीन सदस्य, वेडा राघु र निळा शेपटीचा रापू, निळ्या गालाचा राघू धाच्यासोबत एक नवीन सदस्य या यादीत समाविष्ट झाला.बदामी डोक्याचा रापू (शास्त्रीय नाव) हा भारतात सामान्यत उंच पर्वतरांगांच्या पावश्याशी वास्तवय करणारा राघू प्रजातीचा दिसायला सुंदर असा पक्षी होके व मान बदामी रंगाची गालाचा भाग पिवळा उर्वरित भाग



हिरव्या रंगाचा वनाजूक काळी निमुद्धती चोच ही या पक्ष्याची ओळख भारतात उत्तरेत हिमालय पर्वत रागा, दक्षिणेत पूर्व तसेच पश्चिम घाटात सामान्यतः आढळणारा हा पक्षी प्रजननानंतर स्थानिक तसेच उत्तर-दक्षिण स्थलांतर करण्याच्या नोंदी आहेत जंगलांच्या पायथ्याशी विजेच्या तारावर रस्त्याच्या कडेला असलेल्या इराहावर बसून किडे कीटक व मधमाशी टिपताना हा पक्षी दिसतो नर-मादी दिसायलासारखे असून सहसा हे पक्षी एकत्रित कळप करून दिसतात.

अमरावती जिल्ह्याकरिता ही पहिली नोद असून रापू प्रजातीतील इतर तीन सदस्य, वेडा राघू व निळा शेपटीचा रापू निझ्या गालावा रापूयाच्यासोबत एक नवीन सदस्य या यादीत जुबला आपल्या मूड अधिवासापासून दूर व सामान्य स्थानांतर काळ सोडून जुलै महिन्याच्या शेवटी झालेली ही नोंद या पक्ष्याच्या स्थानांतर संबंधित अभ्यासाव्यादृष्टीने महत्वाची मानली जात आहे. असे पक्षी अभ्यासकांचे मत आहे.आपल्या दैनदिन पक्षी निरीक्षणाद्वारे या आधी ही पक्षी निरीक्षक डॉ. रणजीत यांनी इतरही काही दुर्मिक पक्ष्याच्या नोंदी केल्यात विशेष म्हणाजे या वर्षाच्या सुरुवातीला वॉटर पिपिट (पाण तीरचिमणी) या दुर्मिळ पक्षाची महत्वाची पहिली नोंद महाराष्ट्राचा पक्षिसूचीत त्यांनी केली होती.

## अमरावती जिल्ह्यातील पारडी येथील रेल्वे भुयारी मार्गात आढळला आठ फुटाचा अजगर

### सर्पमित्रांनी केली यशस्वी रेस्क्यू मोहिम, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५पारडी**

पारडी येथील रेल्वे भुयारी मार्गात तब्बल आठ फुटाचा अजगर आढळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. पावसामुळे भुयारी मार्गात पाणी साचल्याने सुरुवातीला हा अजगर कुणाच्याही लक्षात आला नव्हता. मात्र, रात्रीच्या वेळी तो बाहेर आल्यानंतर पादचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

घटनेची माहिती मिळताच सर्पमित्र आकाश गायधने व चेतन माकडे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी अत्यंत दक्षतेने व काळजीपूर्वक अजगराला रेस्क्यू करून जंगलात सोडले. त्यांच्या या धाडसी आणि तत्परतेच्या कार्यामुळे कोणतीही अप्रिय घटना घडली नाही.

या घटनेमुळे स्थानिक नागरिकांमध्ये भितीचे वातावरण असले तरी सर्पमित्रांच्या योग्य वेळी केलेल्या हस्तक्षेपामुळे मोठा अनर्थ टळला. सर्पमित्रांनी नागरिकांना आवाहन केले की, अशा वन्यप्राण्यांच्या बाबतीत घाबरून न जाता त्वरित सर्पमित्र किंवा वनविभागाशी संपर्क साधावा.

## रिद्धपूर जलशुद्धीकरण योजना उठली शेतकऱ्यांच्या जिवावर

### जलशुद्धीकरण योजनेने आणली शेतकऱ्यांवर दुबार पेरणीची वेळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५चांदूरबाजार**

तालुक्यातील विश्रोळी पूर्णा प्रकल्पामधील रिद्धपूरला होणाऱ्या पाणीपुरवठा जलशुद्धीकरण योजनेचे अतिरिक्त पाणी लगतच्या शेतात घुसल्याने शेतकऱ्याऱ्यांच्या शेतपिकाचे अतोनात नुकसान झाले असून संबंधित प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळे कष्टकरी शेतकयांवर दुबार पेरणीचे संकट ओढवलेले आहे.

तालुक्यातील विश्रोळी येथे रिद्धपूर पाणीपुरवठा योजनेचे जलशुद्धीकरण केंद्र ग्रामपंचायत रिद्धपूरच्या अधिनस्त आहे आणि विशेष म्हणजे दैनंदिन देखभालवदुरुस्तीचे काम रिद्धपूर ग्रामपंचायत प्रशासनाकडे असल्याचा तसा उल्लेख फलकावर नमूद केलेले आहे. परतु ग्रामपंचायत प्रशासनाच्या वेळकाढू धोरण व कामचुकार वृत्तीमुळे २१ जूनला जलशुद्धीकरणाच्या झालेल्या पाण्याच्या गळतीमुळे नुकतेच पेरलेले १५ ते २० एकर क्षेत्र पाण्याखाली आले



नुकसानीसंदर्भात शेतकऱ्यांनी माहिती ग्रामपंचायत प्रशासनाला लेखी तक्रार नुकसानीची माहिती दूरध्वनीद्वारे वेळोवेळी कळवली; परंतु शेतकऱ्यांच्या तक्रारीकडे ग्रामपंचायत प्रशासनाने विशेष लक्ष दिले नाही.मंगेश देशमुख यांनी आ. प्रवीण तायडे यांना दूरध्वनी करून शेतीच्या नुकसानीची माहिती दिली. त्यांनी विलंब न लावता प्रशासन हादरखताच ग्रामसचिव व सरपंच घटनास्थळी दाखल झाले व आमसभेत शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईसंदर्भात चर्चा करून त्यांना उचित न्याय देण्याचे आश्वासन दिले खरेः परंतु हे आश्वासन कितपत खरे ठरते, आता याकडे शेतकऱ्याचे लबा लागलेले आहे.

ग्रामपंचायत प्रशासनाच्या अकार्यक्षम दुर्लक्षित कार्यपद्धतीमुळे पुन्हा २० जुलैला जलशुद्धीकरण गळतीचे पाणी पुन्हा शेतात शिरले आहे. कष्टकरी शेतकऱ्यांवर पुन्हा दुबार पेरणीचे संकट ओढवलेले आहे. नुकसानी सदर्भात ग्रामसचिव व सरपंच यांना नुकसानग्रस्त शेतकरी मंगेश देशमुख यांनी दूरध्वनीवरून वारंवार संपर्क केलाः परंतु त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

## तीर्थक्षेत्रांच्या विकासकामांचे अंदाजपत्रक आठ दिवसांत सादर कराउपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निर्देश

### आ. राजेश वानखडे यांच्या लक्षवेधीच्या अनुषंगाने बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५तिवसा**

श्रीक्षेत्र कौंडण्यपूर,मोझरी व वलगाव देवस्थान येथील विकासकामांचा सविस्तर आढावा घेऊन आठ दिवसांच्या आत त्याचे अंदाजपत्रक तयार करून शासनास सादर करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

मोझरी, वलगाव, कौंडण्यपूर विकास आराखडामध्ये शासनाचा प्रचंड निधी खर्च होऊनसुद्धा येथील इमारतीची प्रचंड दुरवस्था झाल्याने मूळ उद्देशालाच हरताळ फासला गेल्याचाबत आ. राजेश वानखडे यांनी पावसाळी अधिवेशनात लक्षवेधी दाखल केली होती. त्या अनुषंगाने अर्थमंत्री अजित पवार यांनी मंत्रालयातील आपल्या दालनात सर्व अधिकाऱ्यांसह बैठक आयोजित केली. यावेळी मोझरी, वलगाव व कौडण्यपूर या तीनही विकास आराखड्यामध्ये



आतापर्यंत करण्यात आलेले निर्माण कार्य, अडचणी वाढ इमारतींची झालेली दुरवस्था याचाचत सविस्तर चर्चा करण्यातआली. या इमारती अत्यंत दुरवस्थेत असल्याने त्यांच्या हस्तांतरणाचा प्रश्न रखडला होता. याबाबत माहिती घेऊन या इमारतींच्या दुरुस्तीकरिता शासन स्तरावरून निधी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे अजित पवार यांनी सांगितले. दुरुस्तीनंतरच सुसज्ज इमारतीसंबंधित संस्थांना हस्तांतरित करण्यात येणार असल्याचे निर्देश त्यांनी यंत्रणेला दिले.बैठकीला अर्थ व नियोजन राज्यमंत्री आशिष जयस्वाल, आ. राजेश वानखडे, आ. संजय खोडके, अतिरिक्त मुख्य सचिव राजगोपाल देवरा, अतिरिक्त सचिव मनीषा म्हैसकर, अ. भा. गुरुदेव सेवा मंडळाचे सरचिटणीस जनार्दनपंत बोथे, कौंडण्यापूर संस्थानचे सचिव सदानंद साधू यांच्यासह दूरदृश्यप्रणालीद्वारे विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, व जिल्हाधिकारी आशिष येरेकर, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी - अधिकारी संजिता महापात्र प्रामुख्याने उपस्थित होते.

## युवतीवर सामूहिक अत्याचार प्रकरणी दोघांना २० वर्षे कारावासाची शिक्षा; वरूड न्यायालयाचा निकाल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५वरुड**

दुचाकीने सोडून देतो, असे म्हणून युक्तीला दोघांनी रस्त्याच्या बाजूला असलेल्या झाडांमध्ये नेऊन तिच्यावर अत्याचार केला. याप्रकरणी पीडित युवतीच्या तक्रारीवरून सदर प्रकरण न्यायालयात गेले असता सुनावणीदरम्यान वरूड न्यायालयाने दोन्ही आरोपींना २० वर्षे कारावासाची शिक्षा सुनावली आहे.रमेश जनार्दन नारनवरे (३५) रा. खडका (जलालखेडा) ता. नरखेड व मंगेश मोरेश्वर देशभ्रतार (३१) रा. तारासावंगा ता. आष्टी जि. वर्धा अश्शी शिक्षा सुनावण्यात आलेल्या आरोपींची नावे



आहेत. १९ मे २०१५ रोजी पीडित मुलगी ही तिच्या मामाच्या घरी पिंपळगाव ता. नरखेड येथे गेली असता आरोपी रमेश जनार्दन नारनवरे याने तिला वारंवार फोन केले. त्यामुळे पीडिता ही त्रस्त होऊन ऑटोत बसून मोवाड येथे आली. ऑटोत असताना रमेशचा फोन आला तेव्हा तिने मी मोवाड जात आहे, असे सांगितले. त्यामुळे रमेश व मंगेश देशभ्रतार हे दोघे दुचाकीने मोवाड येथे आले व तुला वरूड येथे सोडून देतो, असा आग्रह करू लागले. दोघेही आरोपी हे पीडिताचे नातेवाईक असल्याने तसेच मोवाड येथून वरूड येथे यायला वाहन नसल्याने पीडिता त्यांच्या दुचाकीवर बसली. तेथून वरूडकडे येत असताना पुसला मार्गावरील जामठी फाट्याजवळ त्यांनी दुचाकी एका टेकडीकडे आडमार्गाने वळविली. तेव्हा सायंकाळचे ६ ते ६.३० वाजले होते. तेथे त्यांनी एका रायमुनीच्या झुडपामध्ये पीडिताला ओढून दोघांनीही आळीपाळीने तिच्यावर अत्याचार केला. हा प्रकार कुणालाही सागू नकोस, अशी धमकी सुध्दा दिली.या घटनेची तक्रार पीडिताने वरुड पोलिसांत दाखल केली असता पोलिसांनी दोन्ही आरोपीविरुध्द भा.दं. वि. च्या कलम ३७६ सहकलम ५ (जी), ६ पोक्सो ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल केला होता. पोलिसांनी संपूर्ण प्रकरणाचा तपास करून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले सरकारी पक्षाच्यावतीने सरकारी वकील ॲड. सुनील घोडेस्वार यांनी एकूण १० साक्षीदार तपासले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकून विद्यमान न्यायालय जिल्हा व सत्र न्यायाधीश वरूड अमिताभपंचभाई यांनी गुन्हा सिध्द झाल्याने दोन्ही आरोपीना प्रत्येकी २० वर्षे सक्तमजुरीची शिक्षा व प्रत्येकी १० हजार रुपये दंड, दंड न भरल्यास ६ महिने आणखी सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. यामध्ये पूनम डहाके (वजारी) यांनी पैरवी अधिकारी म्हणून काम पाहिले.

# सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांचे दादासाहेब गवई यांना अभिवादन!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी दारापूर येथे आज त्यांचे वडील रा. सु. उपाख्य दादासाहेब गवई यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या स्मृतीस्थळी पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

दारापूर येथे डॉ. दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने स्मृतिशेष दादासाहेब गवई यांच्या स्मृतीदिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. खासदार बळवंत वानखडे, सरन्यायाधीश न्या. भूषण गवई यांच्या मातोश्री कमलताई गवई, संस्थेच्या अध्यक्ष कीर्ती गवई अर्जून, तेजस्विनी गवई, संस्थेचे सदस्य डॉ. राजेंद्र गवई, तक्षशिला अभियांत्रिकी महाविद्यालय






दारापूरचे प्राचार्य डॉ. डी. टी. इंगोले, धरम गवई आदी यावेळी उपस्थित होते. दारापुर फाटा येथे उभारल्या जाणाऱ्या दारापूर गावाचे प्रवेशद्वार श्री. दादासाहेब गवई यांच्या स्मृतिव्दाराच्या बांधकामाचे भूमिपूजन सरन्यायाधीश न्या. गवई यांचे हस्ते यावेळी करण्यात आले.

त्यानंतर तक्षशिला अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या परीसरातील दादासाहेबांच्या स्मृतीस्थळावर अभिवादन करण्यात आले. तक्षशिला अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या परिसरातील इनडोअर स्टेडियममध्ये दादासाहेब गवई यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. यावेळी सामूहिक बुद्धवदंना करण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन सचिव डॉ. कमलाकर पायस यांनी तर आभार अधीक्षक सचिन पंडित यांनी मानले.

## विदर्भ ज्ञान संस्थेला स्वायत्त विद्यापीठ दर्जासाठी सहकार्य करणार - उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

शहराच्या हृदयस्थानी १६७ एकरावर आणि साडेतीनशे विविध वनस्पती असलेल्या शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्थेला स्वायत्त विद्यापीठाचा दर्जा मिळवण्यासाठी सहकार्य करू असे आश्वासन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी दिले.आज शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्थेत परीक्षा भवन व प्रशासकीय इमारत, उपहारगृह, विद्यार्थी सामान्य सुविधा कक्ष, सामायिक परीक्षा कक्ष, वाचनालयाचे उद्घाटन, तसेच स्मार्ट क्लासरूमचे भूमिपूजन करण्यात आले. यानिमित्ताने आयोजित मुख्य कार्यक्रमात उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्थेचे संचालक डॉ. सतीश माळोदे आदी उपस्थित होते.मंत्री श्री. पाटील म्हणाले, महाविद्यालयाला स्वायत्ततेचा दर्जा दिल्याने अनेक विकास कामे चांगल्या पद्धतीने झाली. पालकमंत्री असताना शासन आणि जिल्हा नियोजनमधून दिलेल्या निधीचा चांगला उपयोग झालेला आहे. या निधीमधून देखण्या इमारती उभ्या राहिलेल्या आहेत. त्यामुळे येत्या काळात महाविद्यालयाने स्वायत्त विद्यापीठ होण्यासाठी प्रयत्न करावे. यामध्ये सरकार म्हणून कोणताही अडथळा येणार नाही. स्वायत्त विद्यापीठ होण्यासाठी आवश्यक असणाऱ्या प्रक्रिया करावी. तसेच कागदपत्र तयार ठेवावे. काही विद्यापीठांना संलग्न करून विद्यार्थी केंद्रबिंदू मानून कार्य करावे. स्वायत्त विद्यापीठ झाल्यास विद्यार्थ्यांना आवश्यक असणारे अभ्यासक्रमही स्वतंत्रपणे राबविता येतील.शैक्षणिक विकासासाठी शासन कटिबद्ध आहे. राज्यात वारणा, रयत, होमी भाभा यांना स्वायत्त विद्यापीठाचा दर्जा दिलेला आहे. त्यासोबतच येत्या काळात साडेपाचशे प्राध्यापक आणि सुमारे ३००० अशैक्षणिक कार्य करणाऱ्यांची भरती होणार आहे. विद्यार्थ्यांहित लक्षात घेऊन शासनाने नवीन शैक्षणिक धोरण आणले आहे. या शैक्षणिक धोरणातून माणूस केंद्रित धोरण ठेवले आहे. देशाबद्दल प्रेम असणारा एक नागरिक घडवण्यासाठी यातून प्रयत्न केले जाणार आहे. एक चांगला माणूस व्हावा आणि त्याने अर्थाजन करावे, यासाठी नवीन शैक्षणिक पद्धती उपयुक्त ठरणार आहे. पारंपरिक शिक्षणासोबतच युवक योग, प्राणायाम, चित्रकला अशा विविध अंगांनी हे शिक्षण उपयुक्त ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## मंत्रिमंडळ फेरबदलाच्या चर्चांवर चंद्रकांत पाटील यांची स्पष्टोक्ती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५अमरावती**



मंत्रिमंडळ फेरबदलाच्या चर्चांना पुन्हा एकदा उधाण आले असताना, भाजप नेते व राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील यांनी यावर प्रतिक्रिया देत स्पष्ट शब्दांत सांगितले की, अशा प्रकारची कोणतीही तयारी चाललेली नाही, असा कुठलाही विषय नाही.ना.चंद्रकांत पाटील हे आज अमरावती जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत.यावेळी त्यांनीमाध्यम प्रतिनिधींशी बोलताना त्यांनी काही माध्यमांवर निशाणा साधत म्हटले, दिवसभर तुमचं चॅनेल लोकांनी पाहावं म्हणून तुम्ही 'हनी ट्रॅप', 'धक्का तंत्र' यांसारखी काही तरी गोष्ट निर्माण करता, हे तुमचं काम आहे.त्यांच्या या वक्तव्याने सध्या माध्यमांमध्ये चर्चांना अधिक उधाण आले आहे.

## मी सरन्यायाधीश पदावरून निवृत्त झाल्यानंतर कुठलंही शासकीय पद स्वीकारणार नाही - भूषण गवई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २५ अमरावती**



भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई सध्या अमरावती जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. त्यांच्या मूळगाव असलेल्या दर्यापूर तालुक्यातील दारापूर येथे आज झालेल्या पारिवारिक सत्कार सोहळ्यात त्यांनी महत्त्वपूर्ण विधान केलं.

मी सरन्यायाधीश पदावरून निवृत्त झाल्यानंतर कोणतेही शासकीय पद घेणार नाही, असं स्पष्टपणे सांगत गवई यांनी भविष्यातील राजकीय किंवा शासकीय भूमिकांबाबतचे सर्व तर्क-वितर्क दूर केले.मी जास्तीत जास्त वेळ दारापूर, अमरावती आणि नागपूरमध्ये घालवणार आहे, असेही ते म्हणाले.

## मतदानाला १७ ऐवजी आता १२ च पुरावे धरले जातील ग्राह्य

### स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी आयोगाचे सुधारित आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

मतदाराची ओळख पटविण्यासाठी यापूर्वीच्या मतदार ओळखपत्राव्यतिरिक्त १७पुराव्यांचा आदेश १४ जुलै रोजी आयोगाने रद्द केले आहेत. आता मतदान ओळखपत्राव्यतिरिक्त १२ पुरावे ग्राह्य धरण्यात येणार आहेत.




स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत १७कागदपत्रे सादर करण्याची परवानगी आयोगाने ८ नोव्हेंबर २०११ च्या आदेशाने दिली होती. मात्र, १२ पुरावे ग्राह्य धरण्याचे आदेश १७ ऑक्टोबर २०२४ रोजी दिलेले आहेत. मतदान केंद्र अध्यक्षांद्वारे प्रथम सचित्र निवडणूक ओळखपत्र सादर करण्यास सांगण्यात येईल. असे ओळखपत्र उपलब्ध नसल्यास किंवा त्या मतदाराची ओळख पटत नसल्यास १२ पैकी कोणताही पुरावा सादर करूनच मतदान पार पाडता येईल.

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत विधानसभेची मतदार यादी वापरण्यात येणार आहे. या यादीत मतदाराच्या नावासमोर फोटो किंवा चुकीचा मजकूर असल्यास सुधारणा करण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाला नाहीत. मात्र, अशा मतदाराची ओळख या १२ पुराव्यांच्या आधारे होत असल्यास, त्या मतदाराला मतदानाची परवानगी देण्यात येणार असल्याचे आदेशात नमूद आहे.

**आता हे १२ पुरावे धरणार ग्राह्य**


भारताचा पासपोर्ट, आधार कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, पॅनकार्ड, शासकीय, निमशासकीय कर्मचाऱ्यांची फोटो असलेली ओळखपत्रे, बँक, पोस्ट ऑफिसचे फोटो असलेले पासबुक, सक्षम प्राधिकाऱ्याचा फोटोसहित अपंगत्वाचा दाखला, मनरेगा जॉबकार्ड, निवृत्ती वेतन विषयक फोटो असलेली कागदपत्रे, श्रम मंत्रालयाचे फोटोसहित आरोग्य कार्ड, स्वातंत्र्य सैनिकांचे ओळखपत्र, आमदार, खासदारांचे ओळखपत्र

## विदर्भातील वाघांवर 'एआय'ची नजर पण ई-निविदा न राबविता थेट कंत्राट

### 'कुछ तो गडबड है' असा वनविभागात सूर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

वन्यजीव आणि मानवसंघर्ष रोखण्यासाठी विदर्भातील व्याघ्रप्रकल्पांत कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित तंत्रज्ञान वापरण्यात येणार आहे. गावांच्या सीमेवर वाघ दिसताच एआय सक्षम कॅमेरे नागरिकांना अलर्ट देतील. हा प्रकल्प अत्याधुनिक असून वन्यप्राण्यांवर २४ तास थेट नजर ठेवण्यात येणार आहे. मात्र, कोट्यवधी रुपयांच्या खर्चाच्या या प्रकल्पासाठी निविदा प्रक्रिया न राबविता थेट 'मार्वल' कंपनीसोबत



सामंजस्य करार करण्यात आल्याने एकूणच या प्रक्रियेत 'कुछ तो गडबड है' असा सूर वनविभागात उमटू लागला आहे.

नागपूर येथील नियोजन भवनात शनिवार, १२ जुलै २०२५ रोजी राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत 'मार्वल' कंपनीसोबत सामंजस्य करार करण्यात आला. या करारानुसार विदर्भातील पेंच, ताडोबा-अंधारी, नवेगाव-नागझिरा आणि नागपूर वन विभागातील गावांच्या सीमेवर एकूण ३१५० एआय सक्षम कॅमेरे आणि सायरन लावले जाणार आहेत. या प्रकल्पातून तूर्तास मेळघाट व्याघ्रप्रकल्पाला वगळले आहे. हल्ली 'मार्वल' कंपनीचा एआय बेस प्रकल्प पोलिस तपासात वापरला जात असून, आता वन्यजीव आणि मानव संघर्ष कमी करण्यासाठी तो उपयोगी आणला जात आहे.

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात एकूण ९५ गावे असून २० गावांत सोलर सेट लावण्यात आले असून, त्याला एआय सक्षम सीसीटीव्ही कॅमेऱ्यांशी जोडले आहे. चार गावांत ही प्रणाली लावण्याचे प्रस्तावित आहे. त्याकरिता निधीची मागणी केली आहे. 'मार्वल' कंपनीला ही कामे सोपविली असून, ती राज्य सरकारने नेमली आहे.
**– प्रभुनाथ शुक्ल, क्षेत्र संचालक, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प.**

## ६२ वर्षांपुर्वीचा पूल होणार इतिहासजमा, रेल्वे उड्डाणपुलावर जड वाहतूक अखेर बंद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

शहराच्या वाहतुकीचा कणा असलेला राजकमल चौक रेल्वे उड्डाणपूल अत्यंत धोकादायक स्थितीत पोहचल्याने या पुलावरील जड वाहतूक अखेर बंद करण्यात आली आहे. पोलिसांनी कठडे लावून वाहतूक वळवली असून आता केवळ दुचाकी आणि कारसारख्या हलक्या वाहनांनाच तेथून प्रवेश दिला जात आहे. राजकमल चौक ते रेल्वे स्थानकाला जोडणाऱ्या या रेल्वे उड्डाणपुलाचे बांधकाम १९६३ मध्ये करण्यात आले होते. या पुलाचे आयुष्यमान संपुष्टात आले असून पुलाची स्थिती




समाधानकारक नसल्याने त्या जागी नवीन उड्डाणपूल बांधण्याची आवश्यकता असल्याचे रेल्वे विभागाव्दारे सार्वजनिक बांधकाम विभागास कळविण्यात आले होते.

सार्वजनिक बांधकाम विभागाव्दारे उड्डाणपुलाच्या संरचनात्मक लेखापरीक्षणाचे (स्ट्रक्चरल ऑडिट) काम सुरु करण्यात आले असून प्राप्त प्राथमिक अहवालानुसार अस्तित्वात असलेल्या पुलाच्या स्टिल गडर्सला जंग लागलेला आहे. तसेच डेक स्लॅबमध्ये अनेक ठिकाणी भेगा, डेक स्लॅबमध्ये गळती आणि स्टील गर्डर्सना आधार देणाऱ्या अब्टमेंटमध्ये गळती या सारख्या मोठ्या संरचनात्मक अडचणी आढळून आल्या आहेत. त्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागाने पोलिसांना पत्र दिले.

या पत्रामध्ये रेल्वे उड्डाणपुलाच्या कमकुवत घटकावरील ताण कमी करण्यासाठी पूल फक्त हा हलक्या वाहतुकीसाठी खुला करुन वाहतूक मर्यादीत ठेवावी. जड वाहनांना प्रवेश बंद करण्यात यावा. पर्यायी मार्गाचे नियोजन करावे, असे आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार या पुलावरुन दुचाकी, तीनचाकी, चारचाकी कार वगळता सर्व प्रकारच्या बसेस, सर्व प्रकारच्या मालवाहू वाहन, जड वाहन यांना प्रवेशबंदी करण्यात आली आहे.

## गडचिरोलीला मुसळधार पावसाचा तडाखा, भामरागडसह शंभरहून अधिक गावांचा संपर्क तुटला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५गडचिरोली**

दोन दिवसापासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जिल्ह्यातील नदी नाले दुथडी भरून वाहत असून अनेक भागात पूरस्थिती निर्माण झाली आहे.भामरागड तालुक्याला जोडणाऱ्या पर्लकोटा नदीच्या पुलावरुन पाणी वाहू लागल्याने आज सकाळपासून भामरागड तालुक्यातील शंभरहून अधिक गावांचा जिल्हा मुख्यालयाशी संपर्क तुटला आहे. पुरामुळे आलापल्ली-भामरागड मार्ग बंद असून, जिल्ह्यातील चार मार्गावरील वाहतूक ठप्प झाली आहे. प्रशासनाने अतिवृष्टीचा रेड अलर्ट जारी केल्याने दक्षिणेकडील शाळा, महाविद्यालयांना आज सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.



मागील चोवीस तासांत भामरागड तालुक्यात सर्वाधिक ९९.२ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. त्या खालोखाल एटापल्ली तालुक्यात ६८.४ मिलिमीटर पाऊस पडला. जिल्ह्यातील नऊ विभागांमध्ये अतिवृष्टी झाली असून, ताडगाव परिसरात १२० मिलिमीटर पाऊस पडला आहे. पर्लकोटा नदीच्या पुलावरुन पाणी वाहू लागल्याने आलापल्ली-भामरागड मार्ग बंद आहे. यामुळे ५० हून अधिक गावांचा संपर्क तुटला आहे. शिवाय सिरोंचा असरअली, ताडगाव-दामरंचा व अहेरी-वट्रा हे मार्गही बंद आहेत.